
दैनिक
# सन्मित्र
'SANMITRA' Regd. 1779/57
Postal Regd. No. Tech/47-259/MBI/2003-05
वर्ष ५५ वे अंक क्र. २४६ सोमवार, दिनांक २८ जून २००४ (पृष्ठे ४ किंमत १ रुपया)

## मुंबई इतकीच दर्जेदार सेवा देऊ शकणारे ठाणे जिल्ह्यातील पहिले रुग्णालय 'ओम रुग्णालय' डोंबिवलीत सुरू




*डोंबिवलीतील अत्याधुनिक ओम रुग्णालयामध्ये स्टेनलेस स्टीलपासून बनविण्यात आलेले ऑपरेशन थिएटरचे छायाचित्र.*

डोंबिवली दि. २७ - मुंबईतील ब्रीच कॅण्डी या बड्या खासगी रुग्णालयाप्रमाणे संपूर्ण स्टेनलेस स्टीलचे ऑपरेशन थिएटर असलेले तसेच मुंबई इतकीच दर्जेदार सेवा देऊ शकणारे ठाणे जिल्ह्यातील पहिले रुग्णालय टंडन रोड, डोंबिवली पूर्व येथील कॉमर्स सेंटरमध्ये सुरू झाले आहे. डॉ. वंदना व डॉ. शरद धाकतोडे या दांपत्याचे हे रुग्णालय ओम रुग्णालय (ओॲसिस हॉस्पिटल) या नावाने ओळखले जाते. न्यूझिलंडस्थित इंटरनॅशनल सर्टिफिकेशन लि.चे आयएसओ ९००१ दर्जा प्रमाणपत्र या हॉस्पिटलला मिळाले आहे. सुमारे चार हजार चौरस फुटांच्या प्रशस्त जागेत अत्याधुनिक यंत्रणांनी युक्त तीन ऑपरेशन थिएटर्स व ३५ खाटांची सोय या रुग्णालयात आहे. आयएओ ९००१ च्या दर्जाला साजेशी अत्याधुनिक यंत्रणा या ओम हॉस्पिटलसाठी उभारली आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यातील ऑपरेशन थिएटर हे पूर्णपणे स्टेनलेस स्टीलपासून बनविण्यात आले आहे. त्याचबरोबर ऑपरेशन थिएटरसाठी लॅमिनर एअरफ्लो सिस्टीमचा वापर करण्यात आल्याने ते पूर्णत: निर्जंतुक (बॅक्टेरिया फ्री) राहील. त्यामुळे या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रियेसारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणे शक्य होणार आहे.

अस्थिव्यंग, युरोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, मेंदू शस्त्रक्रिया, मणक्याची शस्त्रक्रिया, लहान मुलांचे आजार, नवजात अर्भकांवरील शस्त्रक्रियांसारख्या सुपर स्पेशालिटी ट्रिटमेंट ओम हॉस्पिटलमध्ये डोंबिवलीकरांना मुंबई इतक्याच खात्रीने उपलब्ध होणार आहेत. मुंबईच्या तुलनेत कमी खर्चात या सेवा उपलब्ध करून दिल्या जातील. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मनस्ताप व खर्च कमी होईल. नवी मुंबई, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर व ठाणे परिसरातील रुग्णांना त्यामुळे लाभ होणार आहे. सी-आर्म इमेज इंटेंसिफायर एक्स-रे टीव्ही सिस्टीम, हैड्रॉलिक ओ.टी. टेबल, सर्वो ९०० सी व्हेंटिलेटर, सेंट्रल ऑक्सिजन, डेफिब्रिटर (हृदयाची धडधड थांबल्यास इलेक्ट्रीक शॉकने पुन्हा चालू करण्यासाठी), पल्स ऑक्सिमिटर (रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण पाहण्यासाठी), इन्फ्युजन पम्प्स (रुग्णाला ठराविक वेळाने स्वयंचलितपणे इंजेक्शन देण्यासाठी) अशा यंत्रणा या रुग्णालयात उपलब्ध केल्या आहेत.

डोंबिवली शहरातील पहिल्या महिला सर्जन डॉ. वंदना धाकतोडे व डॉ. शरद धाकतोडे गेली ११ वर्षे पश्चिमेतील साईश्रद्धा हॉस्पिटलच्या माध्यमातून डोंबिवलीकरांना परिचित आहेत. रविवार ६ जून रोजी उद्घाटन झालेल्या त्यांच्या या ओम हॉस्पिटलच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर अत्याधुनिक व सर्वसोयीसुविधांनी युक्त असे शल्य चिकित्सालय सुरू करण्यात आले आहे. गुंतागुंतीच्या वैद्यकीय आपत्तीप्रसंगी डोंबिवलीकरांना मुंबईला जावे लागत असे. आता मात्र परिस्थिती बदलली असून गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसंगी रुग्णांना डोंबिवलीतून मुंबईकडे हलविण्याची आवश्यकता भासणार नाही असे डॉ.